बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ

जी -१, पार्ले गंगा निकेतन को.ऑप.हा.सो., सुभाष क्रॉस रोड, तुकाराम सांडम मार्ग,

विलेपार्ले ( पूर्व ) ,मुंबई ४०० ०५७ . दूरध्वनी नं.२६८२७६५१ ( वेळ स.११.३० ते दुपारी ३.३०)

वेब साईट :www.mumbaiganitmandal.com ई -मेल : mumbaiganitmandal@gmail.com

दिनांक ३१ ऑगस्ट २०२०

# गणित प्रभुत्व परीक्षा -२०२०

प्रति,

माननीय मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका

सप्रेम नमस्कार,

वर्ष २०११ पासून बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ ,मुंबई , पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ आणि नाशिक गणित अध्ययन अध्यापन विकासन संस्था यांनी "गणित प्रभुत्व "ही परीक्षा इ.५वी व इ.८वी च्या विदयार्थ्यांसाठी सुरू केली आहे.

माध्यम : मराठी , इंग्रजी

परीक्षा शुल्क : रू.१५० /- प्रति विदयार्थी

## प्रवेश अर्ज दिनांक : २५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०२०

## (वैयक्तिक व शाळेसाठी)

कार्यालयीन वेळ : स. ११.३० ते दु. ३.३० वा.

वैयक्तिकरित्या परीक्षेसाठी बसू इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी फॉर्म्स आमच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. फॉर्मवर मुख्याध्यापकाची स्वाक्षरी घ्यावी किंवा मागील वर्षाची शाळेच्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत जोडावी . तसेच फॉर्मवर पालकांचा मोबाईल नंबर व ई मेल आय डी. आवश्यक आहे.

शाळा तसेच वैयक्तिकरित्या परीक्षेसाठी बसु इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी फी बॅकमध्ये भरावी. शाळांनी त्याची पावती मुलांच्या यादीबरोबर आणि वैयक्तिकरित्या भरणा-या विदयार्थ्यांनि फॉर्मबरोबर कुरिअर करावी तसेच मंडळाच्या ई मेल आय.डी वर मेल सुध्दा करावा. फी भरण्यासाठी आवश्यक माहिती पुढीलप्रमाणे बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ, मुंबईच्या नावे बॅक अकाउंट नंबर २८४२००१००९७२२७३ , IFSC CODE :SRCB0000284 सारस्वत बॅंक विलेपार्ले पूर्व मुंबई - ४०० ०५७.

## शाळेसाठी :प्रत्येक इयत्तेच्या यादया पाठविताना मूळ यादी १ + १ झेरॉक्स प्रत पाठवावी.

परीक्षा केंद्राची यादी आमच्या वेबसाईटवर टाकली जाईल. शक्यतो जवळचे केंद्र देण्यात येईल. विदयार्थ्यांचे बैठक क्रमांक आणि प्रवेशपत्र परीक्षेच्या एक आठवडा आधी शाळेत ई- मेल केले जातील. वैयक्तिक विदयार्थ्यांना त्यांचे बैठक क्रमांक व प्रवेशपत्र ई- मेल केले जाईल.

## गणित प्रभुत्व परीक्षा स्तर- १

परीक्षेचा दिवस / दिनांक : रविवार २० डिसेंबर २०२० वेळ दुपारी १२.०० ते ३.००

गुण व परीक्षा अवधी : १०० गुण ३ तास

अभ्यासक्रम इ. ५ वी : पहिली ते चौथीचा अभ्यासक्रम आणि इ.५वी च्या प्रथमसत्रापर्यंतचा अभ्यासक्रम + गणित प्रभुत्व पुस्तक इ.५ वी.

अभ्यासक्रम इ. ८ वी : पाचवी ते सातवीपर्यंतचा अभ्यासक्रम आणि इ.८ वी च्या प्रथमसत्रापर्यंतचा अभ्यासक्रम + गणित प्रभुत्व पुस्तक इ.८ वी.

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : दीर्घोत्तरी (लेखी ) स्तर १ प्रश्नपत्रिकेतील ७० % उदाहरणे गणित प्रभुत्व हया पुस्तकावर आधारित असतील.

ज्या विदयार्थ्यांना ७५% किंवा त्याहून अधिक गुण मिळतील तेच विदयार्थी गणित प्रभुत्व स्पर्धेस (स्तर-२) पात्र ठरतील. हया परीक्षेस वेगळे शुल्क नाही.

## गणित प्रभुत्व परीक्षा स्तर २

गुण व परीक्षा अवधी : १०० गुण , २ तास

अभ्यासक्रम : गणित प्रभुत्व स्तर १ च्या अभ्यासक्रमाशी संबंधित परंतु काठिण्यपातळी अधिक

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : दीर्घोत्तरी (लेखी )

संदर्भ पुस्तक : पुस्तकाच्या यादीसाठी आमची वेबसाईट पहावी.

**सूचना** : १) यावेळी कोविड -१९ मुळे उदभवलेल्या परिस्थितीनुसार गणित प्रभुत्व परीक्षा स्तर -१ ची तारीख बदलण्याचा हक्क मंडळाकडे राहील.

: २) गणित प्रभुत्व परीक्षा स्तर -१ या निकालाची तारीख तसेच प्रभुत्व स्पर्धा परीक्षेची(स्तर-२)तारीख प्रभुत्व परीक्षा स्तर -१ च्यावेळी सांगितली जाईल.

आपल्या विश्वासू


श्रीमती शोभना नेने

**अध्यक्ष**

बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ मुंबई

श्रीमती शिल्पा अभ्यंकर

**कार्यवाह**

बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ मुंबई